शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २ रा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

परतूर शहरात आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वात भव्य तिरंगा रॅली; हजारो देशभक्तांची उपस्थिती

## मोदीजींच्या नेतृत्वातील हा नवा भारत आर्थिक महासत्तेसह नारी शक्तीला प्राधान्य देणारा - आमदार बबनराव लोणीकर

‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम’ या घोषणांनी परतुर शहर दणाणले





**परतूर । प्रतिनिधी-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील नवीन भारत आर्थिक महासत्तेसह नारीशक्तीला प्राधान्य देणारा असून पहेलगाम हल्ल्यानंतर कर्नल सोफिया कुरेशी विंग कमांडर व विकास सिंग यांच्या नेतृत्वात नारीशक्तीच्या विश्वासावर पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याचे काम आपल्या देशाने केले आहे. ७९ वा स्वातंत्र्य दिन व भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ १४ ऑगस्ट रोजी परतुर शहरात तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत माजी सैनिकांसह शेकडो तरूण, महिला यांनीही सहभाग घेतला. भारत माता की जयच्या घोषणा देत सहभागींनी भारतीय सैन्य दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपली देशभक्ती व्यक्त केली. आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली परतुर शहरांमध्ये भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅली दरम्यान भर पावसामध्ये आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकारी विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्यासह हजारो नागरिक सहभागी झाले होते.

रेल्वे स्टेशन ते जिल्हा परिषद प्रशाला परतुर दरम्यान काढण्यात आलेल्या रॅलीत हजारो नागरिक, भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान, ’भारत माता की जय’, ’वंदे मातरम्’, ’जय जवान, जय किसान’ अशा देशभक्तीपर घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. देशभक्तीपर गीतांचेही यावेळी विद्यार्थ्यांनी सादरीकरण झाले. रॅलीदरम्यान पाऊसही सुरू झाला. भारतीय सैन्य दलाचे मनोबल उंचावण्यासाठी आणि त्यांच्या साहसाचे कौतुक करण्यासाठी या तिरंगा रॅलीत सहभागी झालेल्या नाशिककरांनी पाऊस अंगावर झेलत देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या कर्तृत्वाला सलाम केला. अनेकांनी तिरंगा अंगावर परिधान केला होता, तर काहींनी फेटे बांधून सहभाग घेतला होता.

भारतीय सैन्य दलाचे मनोबल उंचावण्यासाठी आणि त्यांच्या साहसाचे कौतुक करण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली आहे. भारतीय जवानांनी दाखविलेल्या शौर्यामुळे संपूर्ण देशाला अभिमान वाटतो आहे. परतुर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनी देखील या तिरंगा रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून राष्ट्रप्रेमाची जाणीव अधोरेखित केली आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या कर्तृत्वाला आम्ही सलाम करतो हेच या अभूतपूर्व रॅलीच्या माध्यमातून परतुर करांनी दाखवून दिले असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी शत्रुघ्न कणसे, संपत टकले, रमेश भापकर, संदीप बाहेकर, प्रवीण सातोणकर, प्रकाश चव्हाण, कृष्ण आरगडे, भगवानराव मोरे, संभाजी वारे, दया महाराज काटे, नरेश कांबळे, संभाजी घनवट, अशोकराव बरकुले, बंडू मानवतकर, अर्जुन जगताप, उपविभागीय अधिकारी डॉ. पद्माकर गायकवाड, तहसीलदार श्रीमती प्रतिभा गोरे, पोलीस निरीक्षक श्री भागवत, गटविकास अधिकारी राजेश तांगडे, गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके ओम शेठ मोर दिलीप शेठ होलानी अमोल शहाणे डॉ. स्वप्नील मंत्री अमोल अग्रवाल जगदीश झवर आनंद कोटीच्या सौरभ बगडिया अजित पोरवाल अमर बगडिया, पंकज कद्रे श्याम जगताप हरिभाऊ मोगल छायाताई घोरबांड, वर्षा पवार, वर्षा खोसे, श्रीमती तांगडे, रवींद्र चांदाज व्हीजे काकडे दिगंबर लीपने राधेश्याम बरकुले, अशोक कानडे निलेश सरदार विलास कोरडे बाळासाहेब मुंडे अरविंद निंबाळकर श्रीमती शीलवंत श्रीमती विघारे श्रीमती पाटील सुनील खरात विष्णू ढवळे अश्विनकुमार गुंजकर जावेद पठाण योगेश बरीदे यांच्यासह लोकप्रतिनिधी पदाधिकारी शिक्षक वृंद विद्यार्थी विद्यार्थिनी व देश प्रेमी नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## रायपूर येथील वेदिका कुकडे हिची एम.बी.बी.एस. साठी निवड



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील रायपूर येथील एका छोट्या ग्रामीण भागातील मुलगी वेदिका राजेश कुकडे हिने नीट २०२५ च्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे हिची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे एम.बी.बी. एस. या वैद्यकीय अभ्यासक्रम ासाठी शासकीय कोट्यातून निवड करण्यात आली आहे.वेदिका कुकडे ही रायपूर सारख्या छोट्या गावात राहून तिची एम.बी.बी एस. साठी निवड होणारी पहिली मुलगी ठरली आहे. वेदिकाच्या या यशाबद्दल तीचे तिच्या पालकाचे सर्व स्तरातून सत्कार व अभिनंदन करण्यात येत आहे.

## शहरातील मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करा - अभिमन्यू खोतकर

अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मोकाट कुत्र्याचा तात्काळ बंदोबस्त करा अन्यथा महानगरपालिका प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

दि.१४ रोजी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या नेतुर्त्वाखाली युवासेनेचे शिष्टमंडळ महानगरपालिकेचे आयुक्त्त संतोष खांडेकर यांना लेखी निवेदन दिले.

जालना शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात सुटला आहे.मोकाट कुत्र्यांच्या चाव्यामुळे जालना शहरातील दोन बळी गेले असून.कित्येक लहान मुले ,वृद्धाना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला आहे.मोकाट कुत्री दुचाकी वाहनासमोर येऊन अनेक जणांचे अपघात झाल्याचे घटना समोर आल्याअसून त्यामुळं जालना शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळं महानगर पालिकेंने या मोकाट कुत्र्यांचा तातडीनं बंदोबस्त करावा अन्यथा युवासेना जालनाजिह्याच्या वतीने जालनेकराच्या भावना लक्षात घेऊन तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात पान २ वर



बैलपोळा सणानिमित्त शेतकऱ्यांना ‘समृद्धी’चा तिसरा हप्ता जाहीर

## १०० रुपये प्रति टन प्रमाणे जमा होणार उसाचे बिल

**घनसावंगी । प्रतिनिधी -** ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देणारा समृद्धी साखर कारखान्याने बैलपोळा सणानिमित्त ऊस बिलाचा तिसरा हप्ता गुरुवारी जाहीर केला. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या उसासाठी १०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे हा हप्ता शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी दिली.

समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी गाळप हंगाम २०२४ -२५ साठी शेतकऱ्यांच्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन प्रमाणे दर जाहीर केला आहे. त्यानुसार पहिला हप्ता २५०० प्रती मे. टन प्रमाणे तर दुसरा हप्ता २०० प्रती मे. टन प्रमाणे यापूर्वी कारखान्याने शेतकऱ्यांना अदा केला आहे. आता बैलपोळा सणानिमित्त १०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे तिसरा हप्ता देण्याचा निर्णय चेअरमन सतीश घाटगे यांनी घेतला असून लवकरच तिसऱ्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.



समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपी पेक्षा २७३ रुपये जास्तीचा दर देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाचा सण आहे. शेतकरी हितासाठी या सणाच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी १०० रुपयांचा तिसरा हप्ता जाहीर केला आहे. लवकरच ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार असल्याचे चेअरमन समृद्धी साखर कारखाना सतीश घाटगे यांनी म्हटले आहे.




युवा आदर्श

### स्वातंत्र्य महोत्सव ...

मनमुक्त स्वातंत्र्याचे
अठ्याहत्तरावे वर्ष
उत्सव करी उत्साही
मना मनात दाटे हर्ष
शहिदांच्या या देशां
हवा प्रगतीचा स्पर्श
त्यांनी सांडले रे रक्त
आपण करू उत्कर्ष
उपकार आपणावरी
केला त्यांनी रे संघर्ष
क्रांतीवीरां श्रध्दांजली
देश करायचा आदर्श
विरोधक सत्ताधारी
करावे सदैव विमर्श
सुवर्ण महोत्सवाकडे
नेईल रे प्रत्येक वर्ष
वाया न हो बलिदान
जाहला परिस स्पर्श
स्वागत नव भारताचे
करीलं विश्व हे सहर्ष
संपवा आता लढाया
आपणांत का संघर्ष
तेव्हांच होईल सफल
अमृत महोत्सवी वर्ष

### दहीहंडी ...

दहीहंडी उत्सव झाला
थरा वरती थर चढला
उत्साह स्पर्शेआभाळा
डीजे आवाज वाढला
बक्षिसांची खैरात होई
अति उत्साह रे नडला
ईर्षा वाढे नसा नसात
धरेवर गोपाळ पडला
गोपी जो जखमीझाला
पडद्या पल्याड गेला
जागेवरी दुसरा आला
खेळ पुन्हा सुरू केला
अपंगत्व आले ज्याला
एकटाचं तो सोसायला
विसरले सारे सगळे
दहीहंडीने खेळ केला
सुरक्षित हवी दहीहंडी
भेटूया त्या गोपाळाला
जमवलेला चंदा औंदा
अर्पण करावा विराला
शास्त्रशुद्ध खेळ खेळा
गालबोट नको सणाला
आनंद भरे सर्व व्यापी
दोष दुःख नको कुणाला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

## भारतीय स्वातंत्र्याची ७८ वर्ष




आपल्या देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत. आजच्याच दिवशी ७८ वर्षापूर्वी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीतुन मुक्त झाला. त्यापूर्वी आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. व्यापारी म्हणून आलेले इंग्रज बघता बघता या देशाचे मालक बनले आणि कोट्यावधी भारतीयांना त्यांनी गुलाम बनवले. देश पारतंत्र्यात गेला. सुमारे दीडशे वर्ष इंग्रजांनी आपल्या देशावर राज्य केले. तेवढ्या काळात त्यांनी आपला इतिहास, आपला पराक्रम आपला स्वाभिमान नष्ट करण्याचेच काम केले. ज्या देशात सोन्याचा धूर निघत होता त्या देशाला कंगाल करण्याचेच काम त्यांनी केले. देशातील नागरिकांना गुलामीची वागणूक दिली. गोरगरीब, सरळ साध्य मार्गाने जगणाऱ्या भारतातील नागरिकांवर त्यांनी अनन्वित अत्याचार केला. इंग्रजांच्या या अन्याय अत्याचाराने त्रस्त झालेल्या जनतेने इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव केला तो १८५७ साली. दुर्दैवाने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही तरी इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांना प्रेरणा देणारा हा उठाव ठरला. या उठावातूनच प्रेरणा घेऊन पुढे हजारो देशभक्त निर्माण झाले. काहींनी सशक्त क्रांतीने तर काहींनी अहिंसेच्या विधायक मार्गाने इंग्रजांशी लढा पुकारला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी हजारो क्रांतिकारांनी स्वतःचे रक्त सांडले, काही फासावर चढले तर काही इंग्रजांच्या गोळीने शहीद झाले. कित्येकांनी तुरुंगवास भोगला. काहींनी काळ्यापाण्याची तर काहींनी जन्मठेपेची शिक्षा भोगली. अशा कित्येक ज्ञात अज्ञात वीरांच्या बलिदानाने देश स्वातंत्र्य झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला रात्री १२ वाजता दिल्लीच्या लाल किल्यावर पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तिरंगा फडकवला आणि देशात स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. देश स्वातंत्र्य होऊन आज ७८ वर्ष पूर्ण होऊन ७९ व्या वर्षात पदार्पण करत आहोत. ७८ वर्ष हे कोणत्याही देशाचे मूल्यमापन करण्यासाठी तसा अतिशय कमी कालावधी पण इतक्या कमी कालावधीतही आपला देश जगातला सर्वाधिक प्रगत देश म्हणून ओळखला जात आहे. गेल्या ७८ वर्षात आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. जो देश सुई ही बनवू शकत नाही असे मानले जात होते तो देश आज चंद्रावर स्वारी करत आहे. भारताने घेतलेली ही गरुड झेप कोणालाही हेवा वाटेल अशीच आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीकडे पाहिले जाते. देश स्वातंत्र होऊन ७८ वर्ष उलटली तरी आपल्या लोकशाहीला अजून कशाचेही गालबोट लागले नाही. २६ जानेवारी १९५० पासून आपला देश प्रजासत्ताक बनला. भारताचे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान व्यक्तीने लिहिले. त्या संविधानानुसारच देशाचा कारभार चालू आहे. आपल्या देशात विविध, जाती, धर्म, पंथाचे लोक या देशात गुण्या गोविंदाने राहतात. प्रत्येक प्रांताची भाषा वेगळी, पेहराव वेगळा, संस्कृती वेगळी असे असले तरी भारतवासीय म्हणून सर्व एक आहोत हीच एकी आपली ओळख आहे. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या जाती, धर्माच्या १४५ कोटी लोकांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम आपल्या संविधानाने केले आहे. म्हणूनच भारतीय संविधानाला जगातील सर्वोत्तम संविधान असे समजले जाते. भारतासोबतच स्वातंत्र्य झालेल्या आपल्या शेजारील राष्ट्राची आज काय अवस्था आहे हे आपण पाहतोच आहे. अवघ्या ७७ वर्षात भारत एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदयास आले. जागतिक महासत्ता बणण्याकडे आपण पाऊले टाकत आहोत. प्रगतीची हीच घोडदौड अशीच चालू राहिली तर आगामी २० वर्षात भारत जागतिक महासत्ता बनेल यात शंका नाही. देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या देशवासीयांना मनापासून शुभेच्छा! जय हिंद!! जय भारत!!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### शहरातील मोकाट ...

आला. यावेळी शैलेश घुमारे,शुभम टेकाळे, दीपक वैद्य ,दिनकर घेवंन्दे ,गोपीकिशन घोगडे,कुणाल जाधव, सागर पाटील, भूषण बनकर ,गोविंद सोनुने,लखन कानिसे, संजय डुकरे ,विक्रम कुसुंदल,अभिषेक जोगदंड , पीटर खंदारे,भोला कांबळे, शेख जफर, शेख नजीर, बिलाल सौदागर,रामिंसन घडे , सौरभ पडघन,सुशील भावसार , अरविंद भालेकर , किरण चोरमारे, बाळकृष्ण कोताकोंडा, राज रत्नपारखे, विक्की वाघमारे, दीपक हवाले,आमेर पठाण, स्वप्नील पाटील आदी सह शेकडो युवासैनिकाची उपस्थिती होती.

# हर घर तिरंगा; लोक महोत्सव

आझादी का अमृत महोत्सवाच्या तत्वाखाली सुरू करण्यात आलेली हर घर तिरंगा मोहीम ही भारताच्या राष्ट्रध्वजाशी असलेल्या नात्याला पूर्णपणे औपचारिक आणि संस्थात्मक प्रतीकापासून ते खोलवर वैयक्तिक चिन्हात रूपांतरित करण्याचा एक मार्ग म्हणून कल्पना करण्यात आली होती. ही कल्पना सोपी पण गहन होती - प्रत्येक नागरिकाला तिरंगा घरी आणण्यासाठी, तो अभिमानाने फडकविण्यासाठी आणि भारताचे स्वातंत्र्य सामायिक आणि मनापासून अनुभव म्हणून साजरे करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी. संस्कृती मंत्रालय या देशव्यापी उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणून काम करते.

स्थापनेपासून, हर घर तिरंगा हा एक वार्षिक कार्यक्रम ते एक मोठ्या जनचळवळीत वाढला आहे. गेल्या काही वर्षांत, देशाच्या कानाकोपऱ्यातून - गर्दीच्या शहरांपासून ते दुर्गम गावांपर्यंत, कॉर्पोरेट कार्यालयांपासून ते शाळांपर्यंत, संरक्षण दलांपासून ते स्वयं-मदत गटांपर्यंत - अभूतपूर्व सहभाग मिळवला आहे. या मोहिमेला ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, रेल्वे, नागरी विमान वाहतूक, सशस्त्र दल आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (उझञ) यांचे सहकार्य मिळाले आहे, ज्यामुळे देशभक्तीचा संदेश प्रत्येक घरात पोहोचतो. मोठ्या प्रमाणात ध्वज निर्मितीमध्ये स्वयंसहाय्यता गटांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, ज्यामुळे तिरंगा सर्वांसाठी उपलब्ध आणि सुलभ आहे याची खात्री होते.

**हर घर तिरंगा २०२५ - राष्ट्राच्या आत्म्याचा उत्सव**

तिरंगा हा केवळ एक ध्वज नाही - तो भारताच्या एकता, विविधता आणि लवचिकतेचे जिवंत प्रतीक आहे. हर घर तिरंगा २०२५ मोहीम मागील वर्षांच्या प्रचंड यशावर आधारित आहे, ज्यामुळे नागरिकांना वैयक्तिकरित्या आणि समुदायामध्ये राष्ट्रध्वजाशी खोलवर जोडण्यासाठी नवीन ऊर्जा, सर्जनशीलता आणि संधी मिळतात.

या वर्षीची आवृत्ती टप्प्याटप्प्याने आयोजित केली जाईल, स्वातंत्र्य दिनापूर्वी देशाच्या कानाकोपऱ्यातून सहभाग सुनिश्चित केला जाईल. १५ ऑगस्ट २०२५ रोजी घरे, संस्था आणि सार्वजनिक ठिकाणी तिरंग्याचे एकत्रित प्रदर्शन करून हा उत्सव संपेल, जो राष्ट्रीय अभिमानाच्या सामूहिक प्रतिमेचे प्रतीक आहे.

**उत्सव योजना; २०२५ साठी प्रमुख उपक्रम**

तिरंगा स्वयंसेवक: नागरिकांना स्वयंसेवा करण्याचे आवाहन केले जात आहे आणि ५ लाखांहून अधिक तरुणांनी त्यासाठी नोंदणी केली आहे. स्वयंसेवक ध्वजाचा इतिहास, महत्त्व आणि शिष्टाचार याबद्दल जागरूकता पसरवत आहेत, ध्वज फडकवत आहेत, सेल्फी शेअर करत आहेत आणि डिजिटल ॲम्बेसेडर बॅज आणि प्रमाणपत्रे घेत आहेत.

हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता: स्वच्छता मोहीम, जलसंवर्धन उपक्रम आणि अमृत तलावांवर ध्वजारोहण आयोजित केले जात आहे, सार्वजनिक आरोग्यासह देशभक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) आणि जल जीवन मिशनच्या उपक्रमांना एकत्रित केले जात आहे.

तिरंगा क्विझ, कला, विणकाम आणि धागे: चूर्र्ीं वर ऑनलाइन क्विझ आयोजित केले जात आहेत, तिरंगा धागे आणि कापडांपासून बनवलेल्या लोककला प्रदर्शित केल्या जात आहेत आणि नागरिकांना तिरंग्याच्या थीमवर आधारित चित्रे, पोस्टर्स, डिजिटल कलाकृती आणि शिल्पे तयार करण्यास प्रोत्साहित केले जात आहे.

तिरंगा पत्रलेखन आणि राखी बनवणे: विद्यार्थी आणि तरुणांना सशस्त्र आणि पोलिस दलांना धन्यवाद पत्रे लिहिण्यासाठी आणि तिरंगा थीम असलेल्या राख्या बनवण्यासाठी आमंत्रित केले जात आहे, ज्यामुळे नागरी-सुरक्षा संबंध मजबूत होतात.

तिरंगा यात्रा, रॅली आणि धावा: एकता, तंदुरुस्ती आणि राष्ट्रीय अभिमानाला चालना देण्यासाठी सामुदायिक ध्वज मिरवणुका, बाईक/सायकल/कार रॅली आणि तिरंगा थीम असलेल्या शर्यती आणि मॅरेथॉन आयोजित केले जात आहेत.

तिरंगा संगीत कार्यक्रम, सेल्फी, श्रद्धांजली आणि मेळे: तिरंगा गीतासह देशभक्ती संगीत कार्यक्रम आयोजित केले जात आहेत, नागरिकांना अधिकृत वेबसाइटवर ध्वजासोबत सेल्फी घेण्यास प्रोत्साहित केले जात आहे, स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जात आहेत आणि स्थानिक कारागीर आणि सामुदायिक मेळाव्यांचे समर्थन करण्यासाठी ध्वज, थीम असलेल्या वस्तू आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल असलेले मेळे आयोजित केले जात आहेत.

**हर घर तिरंगा अभियानासाठी जन भागिदारी**

हर घर तिरंगा अभियान एका समग्र सामाजिक दृष्टिकोनाद्वारे बळकट केले जात आहे, ज्यामुळे मंत्रालये, विभाग, राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि नागरिकांना एकत्रित प्रयत्नात एकत्र आणले जात आहे. या समन्वयित भागीदारीमुळे हा उत्सव देशाच्या प्रत्येक भागात पोहोचेल आणि सर्व वर्गातील लोकांशी जोडला जाईल याची खात्री होते.

जन भागिदारीच्या भावनेने, देशभरातील बचत गटांनी (ड्क्ष्ी) हर घर तिरंगा अभियानाला एक समावेशक चळवळ बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील स्वयंसहायता गट राष्ट्रीय ध्वजांच्या निर्मितीत आघाडीवर आहेत, ज्यामुळे केवळ गुणवत्ता मानकांचे पालन होत नाही तर शहरी आणि ग्रामीण भागात वेळेवर उपलब्धता देखील सुनिश्चित होते. त्यांचे प्रयत्न उत्पादनापलीकडे ध्वजांच्या वितरणात सक्रिय सहभागापर्यंत गेले आहेत, जेणेकरून दुर्गम भागातील नागरिक देखील या उत्सवात सहभागी होऊ शकतील. हे सहकार्य तळागाळात राष्ट्रीय उपक्रम साकार करण्यासाठी समुदाय-चालित उपक्रमांची शक्ती प्रतिबिंबित करते.

हर घर तिरंगा हा भारतीय ध्वज संहितेनुसार साजरा केला जातो, जो नागरिकांना राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा, आदर आणि प्रतीकात्मकता समजून घेण्यास आणि ती टिकवून ठेवण्यास प्रोत्साहित करतो. दरवर्षी, हा देशव्यापी उपक्रम तिरंगा फडकवण्याच्या साध्या कृतीला एकता आणि देशभक्तीच्या सामूहिक उत्सवात रूपांतरित करतो, जिथे संपूर्ण भारतातील घरे, शाळा, कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणे चमकदार भगव्या, पांढऱ्या आणि हिरव्या रंगाने सजवली जातात.

**भारतीय ध्वज संहिता, २००२ ची ठळक वैशिष्ट्ये**

भारतीय ध्वज संहिता, २००२ मध्ये ३० डिसेंबर २०२१ च्या आदेशाने सुधारणा करण्यात आली आणि पॉलिस्टर किंवा मशीन-निर्मित राष्ट्रध्वजांना परवानगी देण्यात आली.

आता राष्ट्रध्वज हाताने कातलेल्या आणि विणलेल्या किंवा मशीन-निर्मित कापसाच्या, पॉलिस्टर, लोकरी किंवा रेशीम खादीच्या ध्वजांपासून बनवला जाईल. कोणतीही सार्वजनिक व्यक्ती, खाजगी संस्थेचा किंवा शैक्षणिक संस्थेचा सदस्य राष्ट्रध्वजाच्या प्रतिष्ठेला आणि आदराला अनुसरून सर्व दिवस आणि प्रसंगी, औपचारिक किंवा अन्यथा, राष्ट्रध्वज फडकवू/प्रदर्शित करू शकतो.

१९ जुलै २०२२ च्या आदेशानुसार भारतीय ध्वज संहिता, २००२ मध्ये सुधारणा करण्यात आली आणि भारतीय ध्वज संहितेच्या भाग-२ च्या परिच्छेद २.२ मधील कलम (ळ) खालील कलमाने बदलण्यात आला:-

(ळ) जेथे ध्वज उघड्यावर किंवा कोणत्याही सामान्य माणसाच्या घरी लावला जातो, तेव्हा तो दिवसा आणि रात्री फडकवता येतो.

राष्ट्रध्वजाचा आकार आयताकृती असेल. ध्वज कोणत्याही आकाराचा असू शकतो परंतु ध्वजाची लांबी आणि उंची (रुंदी) यांचे गुणोत्तर ३:२ असेल.

जेव्हा जेव्हा राष्ट्रध्वज फडकवला जातो तेव्हा तो आदराने हाताळला पाहिजे आणि स्पष्टपणे ठेवला पाहिजे.


क्षतिग्रस्त किंवा विस्कटलेला ध्वज प्रदर्शित केला जाऊ नये.

ध्वज त्याच ध्वज उभारणी स्थानकावरून इतर कोणत्याही ध्वज किंवा ध्वजांसह फडकवू नये.

ध्वज संहितेच्या भाग खखख च्या कलम खद मध्ये नमूद केलेल्या राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल इत्यादी मान्यवरांच्या वाहनाशिवाय इतर कोणत्याही वाहनावर ध्वज फडकवू नये.

राष्ट्रध्वजापेक्षा उंच, वर किंवा शेजारी इतर कोणताही ध्वज किंवा पताका फडकावू नये.

२०२२ मध्ये त्याच्या ऐतिहासिक सुरुवातीपासून ते त्यानंतरच्या वर्षांच्या उत्साहवर्धक टप्प्यांपर्यंत, हर घर तिरंगा अभियान सामूहिक अभिमानाच्या शक्तिशाली अभिव्यक्तीमध्ये विकसित झाले आहे. त्यात असंख्य विक्रम प्रस्थापित झाले आहेत, अभूतपूर्व संख्येने समुदाय एकत्र आले आहेत आणि राष्ट्राप्रती भक्तीच्या असंख्य वैयक्तिक कथा आहेत. २०२५ मध्ये, जेव्हा तिरंगा पुन्हा एकदा प्रत्येक घरात, शाळेत, कार्यालयात आणि रस्त्यावर फडकेल, तेव्हा तो एकता आणि सेवेचे नवीन अध्याय उघडेल, या सामायिक क्षणांचा वारसा पुढे नेईल. हे आपल्याला आठवण करून देते की आपले स्वातंत्र्य हा एक जिवंत वारसा आहे, जो केवळ प्रतीकात्मक हावभावांनीच नव्हे तर तिरंग्याच्या आदर्शांप्रती असलेल्या आपल्या वचनबद्धतेने देखील सन्मानित आहे. त्याच्या रंगाखाली एकत्र उभे राहून, आपण एक राष्ट्र आणि एक लोक म्हणून आपली ओळख पुन्हा स्थापित करतो, त्याग, चिकाटी आणि आशेच्या भावनेने बांधलेला असतो.




### २०२२

२०२२ मध्ये हर घर तिरंगा च्या पहिल्या आवृत्तीने भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी केली, जी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी जन भागिदारीच्या भावनेने सुरू केली. राज्ये/केंद्रशासित प्रदेश, मंत्रालये, स्वयंसेवी संस्था आणि समुदाय गट एकत्र येऊन देशभरात उत्सवाचे वातावरण निर्माण केले. या मोहिमेने उल्लेखनीय टप्पे गाठले, ज्यात चंदीगडमध्ये ५,८८५ सहभागींसह राष्ट्रध्वजाची सर्वात मोठी मानवी प्रतिमा फडकवण्याचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड, २३ कोटींहून अधिक घरांमध्ये तिरंगा फडकवणे आणि अधिकृत पोर्टलवर ६ कोटींहून अधिक सेल्फी अपलोड करणे यांचा समावेश आहे.

### २०२३

२०२३ मध्ये दुसऱ्या आवृत्तीत आणखी उत्साह दिसून आला. ध्वजासोबत १० कोटींहून अधिक सेल्फी अपलोड करण्यात आल्या, ज्यामुळे मोहीम देशभक्तीच्या डिजिटल उत्सवात बदलली. २०२२ आणि २०२३ या दोन्ही वर्षांत, कार्यक्रमाच्या संकरित स्वरूपाने घरी ध्वजासोबत वैयक्तिक भावनिक जोड निर्माण केली, तर ऑनलाइन सहभागाद्वारे मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करण्यास प्रोत्साहन दिले.

### २०२४

२०२४ मध्ये, तिसरी आवृत्ती ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान साजरी करण्यात आली, ज्यामध्ये सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि प्रमुख उद्योग भागीदारांचा सहभाग होता. १३ ऑगस्ट रोजी तिरंगा बाईक रॅली ही एक खास गोष्ट होती, ज्यामध्ये संसद सदस्यांनी प्रगती मैदानातील भारत मंडपमपासून ते प्रतिष्ठित इंडिया गेटजवळून मेजर ध्यानचंद स्टेडियमपर्यंत सायकलिंग केले. देशव्यापी उपक्रमांनी पुन्हा एकदा लाखो लोकांना एकत्र आणले, ज्यामुळे तिरंगा घरी आणणे हे केवळ प्रतीकात्मक नाही - ते राष्ट्राच्या आदर्शांप्रती सामायिक वचनबद्धता आहे हे बळकट झाले.

# जालन्यात तिरंगा सायकल रॅलीत स्वच्छता आणि आरोग्याचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला जालना सायकलिस्ट ग्रुप आणि फ्ब्र रनर्स ग्रुप, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली.

सकाळी ७:३० वाजता मोतीबागेजवळील छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथून रॅलीला सुरुवात झाली. शनिदेव मंदिर, चमन, मस्तगड, सुभाषचंद्र बोस चौक, मामा चौक, सदर बाजार पोलीस स्टेशन, राजेंद्र प्रसाद रोड मार्गे ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे उत्साहात संपन्न झाली.

एकत्र येऊ, स्वच्छता व आरोग्य राखू! या घोषणेसह रॅलीत स्वच्छ जालना, सुंदर जालना, बेटी पढाओ, सायकल चालवा, आरोग्य बनवा, जल है तो कल है असे प्रभावी संदेश दिले गेले. पर्यावरणपूरक प्रवास व निरोगी भविष्यासाठी नागरिकांना प्रेरणा देणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

रॅलीत प्रशांत भाले, काशिनाथ मोरे, रितेश डागा, अनिल मालपाणी, अर्जुन जगताप, कैलास जाधव, भास्कर पवार, डॉ. सतीश शेकडे, दिनेश अण्णा, श्रीराम सर, अजय सिंगला, जवाहर काबरा, कैलास मस्के, प्रमोद पातुरकर, शिवाजी हिवराळे, मिलिंद वासनिक, केशरसिंग राजपूत, संदीप तापडिया, विष्णू पाटेकर, बलराज शिराळे, ईश्वर बिल्लोरे, धनसिंग सूर्यवंशी, गजानन राठोड, मनोज कुमकर, डॉ. दिलीप दिवटे यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

सायकल रॅलीच्या यशस्वीतेसाठी कैलास जाधव, प्रशांत भाले आणि काशिनाथ मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# ज्येष्ठ नागरिक; राष्ट्रीय शक्ती

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश ठरला आहे.आज आपल्या देशाची लोकसंख्या ही अंदाजे दीडशे कोटी पेक्षा जास्त झाली आहे.या दीडशे कोटी लोकसंख्येत जेष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय आहे.भारतातील जेष्ठ नागरिकांची आजची संख्या ही १३ कोटी इतकी आहे.तर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील जेष्ठ नागरिकांची संख्या ही १ कोटी ४० लाख इतकी आहे.दर्जेदार जीवनशैली,आधुनिक उपचार पद्धती, राहणीमान, सकस आहार व आरोग्याविषयी जागृती आदी बाबींमुळे देशातील नागरिकांच्या आयुमानात वाढ होत आहे,ही आनंदाची बाब आहे.पण दुर्दैवाने एकत्र कुटुंब व्यवस्था हे प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या भारतीय समाजात,कुटुंब व्यवस्थेत जेष्ठ नागरिक म्हणजे जणू निरुपयोगी असलेली वस्तू असल्यासारखी दुदैवी परिस्थिती निर्माण होत आहे,ही अत्यंत खेदाची बाब आहे.

खरं म्हणजे, जेष्ठ नागरिकांनील त्यांच्या त्यांच्या नोकरी,व्यवसायात संपूर्ण आयुष्य वेचलेले असते. त्यामुळे ते अतिशय अनुभव संपन्न व्यक्तिमत्वाचे धनी असतात. त्यामुळे भलेही या व्यक्ती त्यांच्या नोकरी, व्यवसायातून जरी रीतसर निवृत्त झाल्या असतील तरी,या इतक्या प्रचंड मोठ्या संख्येचा राष्ट्र उभारण्यासाठी कसा विधायक उपयोग शकेल,यासाठी निश्चित राष्ट्रीय धोरण आखण्याची आवश्यकता आहे. त्याच बरोबर,आला दिवस कसा तरी ढकलायचा असे न करता,आपल्या अनुभवांचा,समाजाला आपण कशा प्रकारे उपयोग करून देऊ शकतो? हा विचार आणि प्रयत्न प्रत्येक ज्येष्ठ नागरिकानेही करण्याची गरज आहे. निवृत्ती म्हणजे निष्क्रियता नव्हे, हे जेष्ठ नागरिकांनील लक्षात घेतले पाहिजे.यथाशक्ती घरातील कामे करणे,आपापले जोडीदार,घरातील इतर व्यक्तींचे जीवन कसे सुसह्य होईल, हे पाहिले पाहिजे.

अर्थात सर्वच जेष्ठ नागरिक हे निष्क्रिय राहतात ,असे नाही. तर काही जेष्ठ नागरिक असेही आहेत की,ते त्यांच्या पहिल्या

करिअरपेक्षा उलट दुसऱ्या; म्हणजेच निवृत्तीनंतरच्या करिअरमुळे जास्त उजेडात आले किंवा त्यांच्या दुसऱ्या करिअरमुळेच त्यांची ओळख निर्माण झाली. अशा काही माझ्या माहितीतील व्यक्ती म्हणजे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे ( समाजसेवक होण्यापूर्वी ते भारतीय लष्करात वाहन



चालक होते) , महाराष्ट्रातील हुंडा बंदी चळवळीचे प्रणेते मामासाहेब कुलकर्णी( ते एस टी महामंडळाच्या सेवेत होते) मराठी माणसांमध्ये उद्योजकता रुजावी म्हणून सातर्डे क्लब चळवळ सुरू करणारे माधवराव भिडे(शासकीय सेवेत कार्यकारी अभियंता होते)अनाथ मुलांसाठी स्थापन केलेल्या वास्तल्य ट्रस्ट चे संस्थापक हे मुंबई महापालिकेच्या सेवेत होते)

अर्थात सर्वच जेष्ठ नागरिक अशा प्रकारचे काम सुरू करू शकतील,असे नाही. पण त्यांनी निदान ,ते जे काही काम समाजासाठी करू शकतात,ते तरी केले पाहिजे असे मला वाटते. उदाहरणार्थ ,आज देशात लाखोंच्या संख्येने निवृत्त लष्करी अधिकारी, जवान, अन्य सेनादले,निवृत्त पोलिस अधिकारी ,कर्मचारी आहेत. अशांनी आपापल्या भागात मुली आणि महिलांसाठी स्वसंरक्षणाचे वर्ग सुरू केले पाहिजे. शिक्षक,प्राध्यापक मंडळींनी प्रौढ साक्षरता आणि शाळाबाह्य मुलांना निदान साक्षर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे,इतर काही जण आपल्या परिसरातील बँका,पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन,तिथे येणाऱ्या निरक्षर बंधू भगिनींना फॉर्म भरून देणे,अन्य मदत करणे, आपापल्या भागातील अनाथालये, महिलाश्रम,वृद्धाश्रम येथे जाऊन तेथील व्यक्तींशी गप्पागोष्टी करणे अशा कितीतरी बाबी करता येण्यासारख्या आहेत.

आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ज्येष्ठ नागरिक संघ कार्यरत आहेत. ते आपापल्या सदस्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवत असतात. त्यांच्यासाठी सहली आयोजित करणे,विविध स्पर्धा,आनंद मेळावे असे साधारण स्वरूप असते. काही जेष्ठ नागरिक संघ मात्र आदिवासी भागात जाऊन,तेथील मुलांना मदत करणे असेही उपक्रम हाती घेत असतात. त्यामुळें जेष्ठ नागरिक संघाचा महासंघ असलेल्या फेस्कॉम ने या प्रकरणी अधिक विचार करून आपापले संघ अधिकाधिक समाजोपयोगी कार्य कसे करू शकतील,याविषयी मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

आता तुम्ही कदाचित म्हणाल, किंवा तुमच्या मनात असा प्रश्न साहजिकच पडला असेल की, तुम्ही आम्हाला इतके सांगताहात,तर तुम्ही स्वतः समाजासाठी काय करताय ? तर मला इथे सांगायला आवडेल की,मी स्वतः सात वर्षांपूर्वी माहिती संचालक म्हणून निवृत्त झालो,तत्पूर्वीच मी आणि माझ्या पत्नी ने हे ठरविले होते की आता पैसा आणि प्रतिष्ठा यासाठी कुठल्याही प्रकारची पूर्णवेळ नोकरी,व्यवसाय करायचा नाही. तर आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करीत , समाजाच्या कल्याणासाठी यथाशक्ती योगदान द्यायचे. त्या प्रमाणे ५ वर्षांपूर्वी कला, साहित्य, संस्कृती, विद्यान, आरोग्य, यशकथा,विश्वबंधुत्व याला वाहिलेले न्यूज स्टोरी टुडे हे आंतरराष्ट्रीय पोर्टल सुरू केले आहे.तीन वर्षांपूर्वी त्याच्या जोडीलाच प्रकाशने आणि नुकतेच यू ट्यूब चॅनल सुरू केले आहे.विविध विषयांवर मी सातत्याने लेखन करीत असतो. व्याख्याने देत असतो. विशेषतः सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना आणि संस्थांना जमेल तशी मदत करीत असतो. ज्या व्यक्तींना ,युवकांना मार्गदर्शनाची गरज आहे,त्यांना त्या त्या प्रमाणे मार्गदर्शन करीत असतो. समाजात नैराश्य न राहता,प्रेरणादायी वातावरण कसे राहील,यासाठी मी प्रयत्न करीत असतो. यासाठी मी निवृत्तीनंतर, प्रेरणेचे प्रवासी, अभिमानाची लेणी, ( इ बुक _ कोरोना काळात प्रकाशित) आम्ही अधिकारी झालो,करिअरच्या नव्या दिशा, माध्यमभूषण ही पुस्तके लिहिली असून,काही पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

तर मंडळी, चला तर आपण सर्व जेष्ठ नागरिक मिळून हे सिद्ध करू या की, जेष्ठ नागरिक हे कुटुंबावर,समाजावर,देशावर पडलेला बोजा नसून ती एक राष्ट्रीय शक्ती आहे. असे सक्रीय जीवन हे आपल्या शारीरिक, मानसिक, भावनिक

सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने देखील खूप महत्त्वाचे पाऊल ठरेल. आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त होईल. जीवन अधिक हिरीरीने जगण्यासारखे वाटू शकेल.तर मग,या स्वातंत्र्यदिनी असा काही संकल्प निश्चित करणार ना? जय हिंद.

**देवेंद्र भुजबळ**
**निवृत्त माहिती संचालक**
**९८६९४८४८००.**

# जालन्यात आज वंचित बहुजन आघाडीच्यावतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना घेराव आंदोलन




**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात वंचित बहुजन आघाडीकडून उद्या घेराव आंदोलन करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना घेराव घालून हे आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती जालन्याच्या वंचितच्या पदाधिकाऱ्यानी दिलीय. विविध योजनेचे लाभार्थी जिल्हा परिषदेतील कृषी अधिकाऱ्यांकडे थकीत बिलांसाठी मागील ४ महिन्यांपासून चकरा मारतायत. मात्र, अद्यापपर्यंत थकित बिले लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेली नाहीये. दरम्यान, जिल्हा परिषदेचा कारभार नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांभाळल्यानंतर त्या लाभार्थ्यांचे बिले थकीत ठेवणार नाही अशी अपेक्षा होती. मात्र नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी फक्त स्वच्छतेच्या कामांमध्ये व्यस्त आहेत असा आरोप देखील वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने केला आहे. तसेच थकित बिले तातडीने लाभार्थ्यांना देण्याच्या मागणीसाठी उद्या वंचित बहुजन आघाडी कडून घेराव आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती विजय लहाने यांनी दिली आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेला निवेदनात नमूद करण्यात आले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन विकास योजना अंतर्गत विहीरीच्या मंजूर लाभाध्यांना गेल्या ४ महिन्यांपासून आद्यापपर्यंत थकित बिलं अदा करण्यात आलेले नाही. यामध्ये विशेष बाय म्हणून मागासवर्गीय लाभाथ्यांची बिलं अधिकारी वर्गामार्फत मुद्दामहून थकित ठेवण्यात आलेली आहे. मागासवर्गीयी लाभाच्या ऐवजी इतर लाभार्थ्यांची बिलं मात्र अधिकारी बर्गाने अदा केलेली आहे.

अधिकारी वर्गाच्या या तुलनात्मक व्यवहारामुळे मागासवगीय समाजातील लाभाची बंचित राहत आहे. त्यामुळे त्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. विहीरी मंजुर होऊन, बांधकाम होऊन सुध्दा बिलं थकित असल्यामुळे त्यांच्या शेतीवर याचा मोठा परिणाम जाणवत आहे. शेतकरी वर्गाने खाजगी सावकारांकडून मोठ्या व्याजदरावर पैसे उचल घेऊन बिहरीचे काम पूर्ण केलेले आहे तर काहीचे काम सुरु आहे. त्यामध्ये अधिकारी वर्गामार्फत बिलं थकीत ठेवुन लाभार्थ्यांचे मोठे आर्थिक नुकसान केल्या जात आहे. एाजगी सावकारांच्या व्याजाचा पैसा लाभार्थाच्या माथ्यावर वाढत चालला आहे.

करीता आपणांस विनंती की, डॉ. बाबासाहेब अबिडकर कृषि स्वावलंबन विकास योजना अंतर्गत मंजूर झालेल्या मागासवर्गीय लाभार्थ्यांच्या विहरीचे थकित बिलांचे त्वरीत अदा करण्यात यावे व त्यांना त्वरीत न्याय देण्यात यावा. अन्यथा उद्या दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी अशा मागासवगीय लाभार्थ्यांच्या समवेत न्याय व हक्कासाठी आंदोलन व निदर्शने करण्यात येईल असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष विजय लहाने, शेख लालाभाई, सिद्धार्थ कनकुटे, अरुण गायकवाड, साळूबा लोखंडे, बाबसाहेब जाधव, विकास पाखरे, अंकुश गाडेकर, ओम जाधव, रंगनाथ लोखंडे, प्रभू लोखंडे, भाऊसाहेब लहाने, कृष्णा लहाने, दीपक कांबळे, विजय कांबळे, मनोज लोखंडे, लक्ष्मण कापसे

यांचे स्वाक्षरी आहे

# शेख अब्दुल रहीम यांचा जुनी पेन्शन हक्क संघटनेच्या राज्य प्रवक्ता पदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा

**छत्रपती संभाजीनगर -** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता आणि सदस्य शेख अब्दुल रहीम यांनी आपला राजीनामा सादर करत पद आणि सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. संघटनेचे राज्य सरचिटणीस सचिन चव्हाण आणि संस्थापक अध्यक्ष शिवराम घोती यांना त्यांनी व्हॉट्सप आणि ई-मेलद्वारे राजीनामा पाठविला. गेल्या ३ वर्षे ५ महिन्यांच्या कार्यकाळात शेख अब्दुल रहीम यांनी अनेक विद्यार्थी-शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावले. तथापि, संघटनेचा मुख्य उद्देश असलेला जुनी पेन्शन विषय मार्गी लागला नाही, ही खंत त्यांनी व्यक्त केली. याच कारणास्तव त्यांनी संघटनेतील सर्व जबाबदाऱ्यांमधून स्वतःला मुक्त करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.



मी या पदाला न्याय देऊ शकलो नाही, त्यामुळे ही माझी जबाबदारी समजून आजपासून सदस्यत्व आणि राज्य प्रवक्ता पदाचा राजीनामा सादर करत आहे, असे शेख अब्दुल रहीम यांनी स्पष्ट केले. त्यांनी राजीनामा स्वीकारून पदमुक्त आणि कार्यमुक्त करण्याची विनंतीही केली आहे. संघटनेतील त्यांच्या कार्यकाळात शैक्षणिक, संघटनात्मक आणि शिक्षकांच्या हिताचे अनेक उपक्रम राबविण्यात आले. मात्र, मुख्य मागणी अद्याप अपूर्ण राहिल्याने त्यांनी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

# कविता स्वातंत्र्याची कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** येथील हॉटेल मेरीट सभागृह, रेल्वे स्टेशन परिसरात आज ( ता. १५) संध्याकाळी ६.३० वा. ' कविता स्वातंत्र्याची ' या काव्यमय कार्यक्रमाचे आयोजन मसाप शाखा जालनाच्या वतीने करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध नाट्यकलावंत संभाजी तांगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यातील कवी विठ्ठल काष्टे,रत्नमाला मोहिते,प्रदीप देशमुख,नारायण खरात, धनंजय गव्हाले, विद्या दिवटे, राज रणधीर,गणेश खरात, अशोक डोरले,सुरेश कायटे हे आपल्या रचना सादर करणार असून या कार्यक्रमाचे निवेदन रंगनाथ खेडेकर हे करणार आहे.स्वातद्र्य दिनाच्या निमित्ताने होणाऱ्या या कार्यक्रमास साहित्य रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक राजाराम जाधव,अध्यक्ष रवींद्र तौर, सचिव पंडितराव तडेगावकर सह मसाप कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जालन्यात भाजपातर्फे तिरंगा पदयात्रा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे हर घर तिरंगा अभियानांतर्गत तिरंगा पदयात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली.या पदयात्रेची सुरुवात सरस्वती भुवन शाळेतून झाली. मार्गक्रमण करत हुतात्मा स्मारक, लोकमान्य टिळक स्मारक, स्व. भगवंतराव गाढे स्मारक(माजी मंत्री), सावित्रीबाई फुले स्मारक आणि महात्मा गांधी स्मारक येथे पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर ही पदयात्रा पुन्हा सरस्वती भुवन शाळेत येऊन संपन्न झाली.

या पदयात्रेत भाजपा नेते माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, अक्षय गोरंट्याल यांच्यासह देशभक्त नागरिक, आजी-माजी पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या पदयात्रेचे आयोजन जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम यांनी केले. देशभक्तीच्या घोषणा आणि राष्ट्रीय ध्वजाच्या फडक्यात ही पदयात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.



# दुःखानंतर सुखाची मंगलमय पहाट उगवते...

पृथ्वीतलावर ज्याच्या जीवनात जराही दुःख नाही, असा माणूस शोधायला गेल्यावर शोधूनही सापडेल याची शाश्वती कोणीही देऊ शकणार नाही. म्हणजे ज्याच्या जीवनात दुःख नाही असा माणूस अजून तरी पृथ्वीतलावर अस्तित्वात आला नाही. दुःखाविना मानवाचे जीवन नाहीच. मग तो गरीब असो की श्रीमंत, झोपडीत राहणारा असो की महालात, भिकारी असो की करोडपती, प्रत्येकाच्या जीवनात दुःख हे असतेच. दुःखानंतर सुखाची आणि सुखानंतर दुःखाची मालिका ही सुरूच असतेच. जीवनात दुःख आले म्हणून खचून जायचे नसते आणि सुख आले म्हणून हुरळून जायचे नसते. काहीजण जीवनात दुःख आले म्हणून खचून जातात आणि दुःखी व निराश होतात आणि टोकाचा निर्णय घेऊन स्वतःचे अनमोल जीवन संपवतात. त्यांच्या लक्षात हे येत नाही की, मानवी जीवन हे सुखदुःखाचे गाठोडे आहे. जीवनाची वाटचाल करत असताना माणसाला सुखही अनुभवायला मिळते आणि दुःखही अनुभवायला मिळते. सुखदुःखाचे सुंदर मिलन म्हणजेच मानवी जीवन होय. फक्त माणसाने जरासा धीर धरायला हवा. दुःखानंतर सुखाची आणि सुखानंतर दुःखाची मंगलमय पहाट उगवतेच. कारण तो मानवी जीवनाचा एक नियमच आहे. पण माणूस सुखाला फार हापापलेला असतो. त्याला जीवनात नेहमी दुःखाऐवजी सुखच असावे वाटते. म्हणून तो सारखी सुखाची अपेक्षा ठेवत असतो. जीवनात अचानक आलेले दुःख हे माणसाला पर्वताएवढे वाटते आणि सुख हे जवाएवढे वाटते, म्हणजेच सुखाचा वाटा त्याला फार कमी वाटतो, असे संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात म्हटले आहे. माणूस स्वतःची तुलना दुसऱ्याबरोबर करून दुसऱ्यांना आपल्यापेक्षा सुखी व स्वतःला दुखी समजत असतो. त्याला वाटत असते की, त्याच्याकडे आलिशान गाडी व बंगला आहे. त्याच्याकडे भरपूर पैसा व संपत्ती आहे. त्याचा फार मोठा उद्योगधंदा आहे. तो मोठ्या पदावर उच्चपदस्थ अधिकारी आहे. म्हणून त्यांच्या जीवनात किती सुख असेल? ते आपल्यापेक्षा किती सुखी जीवन जगत असतील? आपलाही जन्म अशा श्रीमंत घरात झाला असता तर किती बरे झाले असते? असे अनेक प्रश्न स्वतःला विचारून ते स्वतःच्या नशिबाला दोष देत बसतात. आणि ते आणखीन दुखी होतात. बांधवांनो, या जगात कायम सुखी असा कोण आहे? आणि कायम दुखी असा कोण आहे? ज्याच्या जीवनात आतापर्यंत कधीच दुःख आले नाही असा माणूस पृथ्वीतलावर अजून तरी जन्माला आला नाही, हे कोणालाही मान्य करावेच लागेल. आणि इथून पुढेही जन्माला येणार नाही. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. मानवाला जीवनात दुःख येणे हे सहाजिक आहे. कोणाला मनाविरुद्ध काही घडले की, लगेच दुःख येणे हे स्वाभाविक आहे. कोणाला परीक्षेत एक-दोन गुणांनी अपयश आले की, लगेच दुःख येते. कोणाला जिवलग व्यक्तीने धोका दिला की, त्याच्या मनाला खूप वेदना होतात. काहीजण वेळेवर लग्न जुळत नाही म्हणून दुःखी जीवन जगतात. काहीजण उद्योग धंद्यात बरकत येत नाही म्हणून स्वतःला दुःखाच्या खाईत लोटतात. वृद्ध आई-वडिलांना स्वतःच्या मुलांनी घराबाहेर काढले की, त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो. प्रियकराला प्रेयसीने धोका दिला की, त्याच्या जीवनात दुःखाचा काळोख पसरतो. गर्भश्रीमंतीत व्यक्तीला आपण कमावलेली संपत्ती कोणी हडप तर करणार नाही ना? आपली मुले आपण कमावलेली संपत्ती सुरक्षित ठेवतील की नाही? या भीतीने त्यांच्या मनात दुःख निर्माण होते. आणि ते दुःख त्यांना सातत्याने बोचत राहते. काहीजणांना छोट्या छोट्या गोष्टीचे दुःख वाटत असते. आपली पत्नी आपल्यासोबत शेवटपर्यंत एकतर्फी राहील का? आपल्या माघारी ती दुसऱ्या सोबत अनैतिक संबंध ठेवायची तर नाही ना? तसेच आपली मुलगी भविष्यात कोणासोबत पळून तर जाणार नाही ना? आपली मुले मुली आपल्या नावाला कलंक तर लावणार नाहीत ना? दिलेल्या घरी माझी मुलगी आनंदात व सुखात संसार करेल का? असे एक ना अनेक प्रश्न माणसाला पडत असतात. आणि यातूनच माणसाच्या जीवनात दुःखाचा महासागर निर्माण होत असतो. दुःख माणसाचा पिछा कधीच सोडत नाही. म्हणून दुःखाला माणसाने कधीच घाबरायचे नाही. दुःख हे माणसाच्या पाचवीला पुजलेले असते. जी माणसे दुःखाला न डगमगता दुःखावर मात करतात तीच माणसे जीवनात यशस्वी होतात. पण काही माणसे जराही दुःख आले की घाबरून जातात, आणि स्वतःला दुःखाच्या व नैराश्याच्या खाईत लोटतात आणि मनोरुग्न होऊन स्वतःचे जीवन संपवतात. म्हणून दुःखाचा विचार करायचा नाही. दुःखानंतर सुखाची सुंदर पहाट उगवणारच आहे, ही अपेक्षा मनात ठेवून जीवन जगायचे असते. केवळ सुखच मिळावे म्हणून जर जीवन जगायचे असेल, तर ते कोणालाच शक्य नाही. माणसाला दुःखाशिवाय सुखाची किंमत कळणार नाही. जीवनात दुःखही असायला हवे आणि सुखही असायला हवे, तरच जीवन जगायला खरी मजा येते. माणूस दुःखातून तावूनसुलाखून बाहेर निघतो आणि जिद्दीने पेटून लढायला उठतो. काहीजण आलेले दुःख पचवून आणखी जोमाने अभ्यास करतात आणि यशाला काबीज करतात. तर काहीजण जीवनात आलेले दुःख हे थेट आभाळाएवढे समजून मनाने पूर्णपणे खचून जातात आणि स्वतःला कमजोर समजतात व स्वतःची जीवनयात्रा संपवतात. जीवनात आलेले दुःख व अपयश पचवता न आल्यामुळे आत्महत्या करणाऱ्यांच्या संख्येत आता खूप वाढ झाली आहे. ही देशासाठी अतिशय चिंताजनक व खेदाची बाब आहे. ज्यांना जीवनात आलेले दुःख व अपयश लीलया पचवता येते, त्यांना खऱ्या अर्थाने जीवन जगता येते. आणि अशी माणसे जीवनात नक्कीच यशस्वी होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट व नाजूक होती. त्यांना जीवनात आर्थिक परिस्थितीमुळे आणि महार जातीचा असल्यामुळे पदोपदी दुःखाचे विखारी चटके सहन करावे लागले होते. तरीसुद्धा बाबासाहेब न डगमगता व आतून न खचता दुःखाचे विखारी चटके सहन करीत आपले काम करतच राहिले आणि जीवनात यशस्वी होत राहिले. स्वतःच्या आणि दिन, दलित, शोषित, पीडित, वंचित, उपेक्षित कामगारांच्या जीवनात सुखाचा व आनंदाचा प्रकाश निर्माण केला. भारत भूमीत असे कितीतरी महामानव होऊन गेलेत, ज्यांनी दुःखावर मात करून सुखाला काबीज केले आहे. त्यासाठी त्यांनी परिस्थितीला कधीच दोष देत बसले नाहीत. आलेल्या संकटांना डगमगले नाहीत. त्यांनी जीवनाची वाटचाल करत असताना जीवनात आलेले दुःखाचे डोंगर हातोड्याने फोडून सुखाची वाट शोधत राहिले आणि स्वतःचे व समाजाचे जीवन सुखी केले. म्हणून बांधवांनो, आपण देखील या महापुरुषांची प्रेरणा घेऊन जीवनाची वाटचाल केली पाहिजे. जीवनात आलेल्या दुःखाचा व अपयशाचा सामना करून न डगमगता व न खचून जाता सुखाच्या व यशाच्या महासागरात पदार्पण केले पाहिजे. त्यासाठी दुःखाला व संकटाला कधीच डगमगायचे व घाबरायचे नाही. दुःख, संकट व अपयश हे जीवनात येतच असते, त्यासाठी आतून खचून न जाता, मानसिक ताण न घेता, निराश होऊन टोकाचा पाऊल न उचलता दुःखाचा, अपयशाचा व संकटाचा सामना करत चला... तिकडे सुख व यश तुमची वाट पाहत आहे... फक्त जरा धीर धरा आणि हिंमतीने दुःखावर व अपयशावर मात करा...कारण दुःखानंतर सुखाची मंगलमय पहाट उगवणार आहे.

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## स्वातंत्र्यदिनी अन्यायग्रस्त शिक्षकांचे मुख्याध्यापक तथा सचिव यांच्या अन्यायाविरुद्ध आमरण उपोषण



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** कै.नानासाहेब पाटील विद्यालय नजीक पांगरी ता. बदनापूर जि.जालना येथील मुख्याध्यापक तथा संस्था सचिव प्रल्हाद वाघ यांच्याकडून होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात जालना जिल्हा परिषदेच्या समोर शिक्षक व कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण आज सुरू झाले आहे.

शालेय प्रशासनाकडून होणाऱ्या आर्थिक व मानसिक छळ थांबवा., आमच्याकडून जबरदस्तीने घेतलेली पैसे परत द्यावे. मुख्याध्यापकाकडून होणारी दमदाटी व शिवीगाळ बंद करणे. शासन नियमाप्रमाणे शाळेची वेळ करावी. थकित वेतन देण्यात यावे., शिक्षक हजेरीपटावर नियमित स्वाक्षरी घेण्यात यावी., मुख्याध्यापकाची हुकूमशाही व कर्मचाऱ्यातील भेदभाव थांबवावा., नियुक्ती आदेश व मान्यता आदेशाची प्रत द्यावी., सेवा पुस्तिकेचे दुय्यम प्रत देण्यात यावी., शालेय पोषण आहाराच्या गैर व्यवहाराची चौकशी करून दोषीवर कार्यवाही करावी., जबरदस्तीने स्वाक्षरी घेऊन घेतलेले कोरे धनादेश परत करण्यात यावे., महावर पगार पत्रके देण्यात यावी., आयकर संबंधित पत्रके द्यावीत. या मागण्यांचा समावेश आहे.

प्रभाकर गणपत ढाकणे, दत्तू नामदेव एखंडे, श्री. गौतम कचरू थोरात हे उपोषकर्ते आहे. यावेळी मराठवाडा शिक्षक संघचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, जिल्हासचिव संजय येळवंते, कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद मार्गदर्शक डॉ.मारोती तेगंमपुरे, प्रा राज्यक्रांती वलसे, जिल्हा उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, सेवानिवृत्त शिक्षक गौतम बनसोडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी केदार, कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद, सहसचिव प्रद्युम्न काकड,भागवत काकडे,सोहम बोदवडे,शेख रशीद,संजय चव्हाण,राहुल साळवे,सचिन अंबडकर,गणेश मेहेत्रे , प्रा दत्ता देशमुख, मन्सूर शेख,महिला प्रतिनिधी शिरीन बेगम शहा, प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल इत्यादी उपस्थित होते.

# वर्षागणिक वाढत्या हिरवाईचा उपहार

## संत निरंकारी मिशनचे वननेस वन अभियान; निसर्ग कॉलनी परिसरात होणार वृक्षारोपण

**जालना । प्रतिनिधी -** संत निरंकारी मिशन हरित जाणीवेला आणि पर्यावरणाप्रती अतूट समर्पणाला निरंतर वृद्धिंगत करत वननेस वन उपक्रमाच्या पाचव्या चरणांतर्गत देशभरातील अनेक नवीन ठिकाणे या जनसामुदायिक अभियानाशी जोडेल. सकाळी ६ ते ९ दरम्यान हजारो सेवेकरी आणि श्रद्धाळू भाविक एकत्रितपणे वृक्षारोपणाच्या माध्यमातून निसर्गाप्रति आपली निष्ठा व त्याच्या संरक्षणाचा संकल्प याचा पुनरुच्चार करतील.

जालना नगरीमध्ये यापूर्वी नवीन एमआयडीसी येथे पहिल्या टप्प्यात २१ ऑगस्ट २०२१ वृक्षारोपण ६५० झाडे लावण्यात आले तर ०४ ऑगस्ट २०२४-१५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर आता तिसरा टप्पा १७ ऑगस्ट २०२५ रोजी निसर्ग कॉलनी, निरामय हॉस्पीटलसमोर, व्हीव्हीएस कॉलेजच्या पाठीमागे, ममादेवी ते रेल्वे स्टेशन मार्ग, जालना येथे शंभर झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली २०२१ मध्ये सुरू झालेली वननेस वन परियोजना ही केवळ एक वृक्षारोपणाचा उपक्रम यापुरते मर्यादित नसून ते निसर्गाशी समतोल व सह-अस्तित्वाची भावना जागृत करणारे एक महत्त्वपूर्ण अभियान आहे. आपण निसर्गापासून वेगळे नसून त्याचाच एक अविभाज्य अंग आहोत ही भावना या अभियानातून शिकवली जाते. तद्वत या निसर्गाचे संरक्षण म्हणजे प्रत्यक्षात स्वतःच्या जीवनाचे आणि भविष्याचे रक्षण करणे होय.

वृक्षांच्या या रोपट्यांनी इतकी घनता प्राप्त केली आहे की ती आता एका लघु वनाचे स्वरूप धारण करु लागली आहेत. हे परिवर्तन केवळ बाह्यरूपी हिरवळी पुरते मर्यादित न राहता, आता या लघु वन प्रदेशात अनेक प्रवासी व दुर्मिळ प्रजातींचे पक्षीही आश्रय घेऊ लागले आहेत, ज्या प्रजाती पूर्वी नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर होत्या.

निःसंशयपणे, जैवविविधता व पर्यावरणीय समतोल राखण्यात या सर्व सजीवांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. वननेस वन अभियान हे केवळ




पर्यावरणाच्या रक्षणाचे माध्यम नाही, तर मानव आणि निसर्ग यामध्ये पुन्हा एकदा आत्मिक नातेसंबंध स्थापित करत आहे. एक असे नाते जे खर्या अर्थाने मएकत्वाचेफ प्रतीक आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे वननेस वन अभियानाअंतर्गत आतापर्यंत देशभरातील ६०० हून अधिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. ही केवळ हिरवळ वाढवण्याची मोहिम नसून, लघु वनांच्या रूपात एक शाश्वत आणि संतुलित पर्यावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक यथायोग्य प्रयत्न आहे. मिशनचे स्वयंसेवक या वृक्षरोपांची देखभाल अत्यंत श्रद्धा व समर्पणाने करत आहेत, कारण त्यांच्यासाठी प्रत्येक रोपटे हे केवळ एक वृक्ष नसून भावी पिढ्यांच्या श्वासांचा आधार आहे.

पूज्य बाबा हरदेव सिंहजी यांचा सुवर्णरूपी संदेश - प्रदूषण अंतर्मनातील असो अथवा बाह्यजगातील, दोन्ही हानिकारक आहेत - या संपूर्ण अभियानाचा प्रेरणास्त्रोत बनला आहे. याच जाणीवेने प्रेरित होऊन, संत निरंकारी मिशनचे सेवादार बाह्य पर्यावराणासोबत अंतःकरणाची शुद्धता राखण्याच्या दिशेने प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करत आहेत. कारण जेव्हा मन निर्मळ असते, तेव्हाच विचार, वाणी आणि कर्महीं निर्मळ असतात.

संत निरंकारी मंडळाचे सचिव, श्री. जोगिंदर सुखीजाजी यांनी सांगितले, की वननेस वन उपक्रमांतर्गत स्थानिक पर्यावरणानुसार वृक्षांची निवड करून त्यांची देखभाल जैविक खत, स्वच्छ पाणी आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केली जाते, जेणेकरून दीर्घकाळ हरितता सुनिश्चित होईल. ते पुढे म्हणाकिरण गरड

ले, की पर्यावरण संकटाच्या या काळात मिशनचा हा पुढाकार एक समयसूचक, जागरूक आणि समाजासाठी प्रेरणादायक असा उपक्रम आहे.

निःसंशयपणे, हा उपक्रम संत निरंकारी मिशनच्या निसर्गप्रेमाचे आणि त्याप्रती असलेल्या जबाबदारीचे एक उज्ज्ल उदाहरण आहे, जे समाजाला सह-अस्तित्व आणि समतोल या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देत आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.